# वॉटर कुलर व वॉटर प्युरिफायर व दुरूस्ती व दखेभाल करणेबाबत

## जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते कि, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व त्या अधिपत्याखालील तालुका न्यायालयातील इमारती मध्ये एकून ३९ वॉटर कुलर व ४३ वॉटर प्युरिफायर आहेत. पक्षकार, वकील वर्ग व स्टाफ यांना पिण्याचे पाण्याची सोय व्हावी म्हणून वॉटर कूलर व वॉटर प्युरिफायर बसविणेत आले आहेत. तरी जिल्हा न्यायालय कोल्हापूर व त्या अधिपत्याखालील सर्व तालुका न्यायालयातील इमारती मध्ये बसवणेत आलेले वॉटर कुलर व वॉटर प्युरिफायर दुरूस्ती व देखभाल करार दोन वर्षा करिता करणेचा आहे. नोंदणीकृत तसेच इच्छुक सेवाधारकांकडून ही जाहीरात प्रसिध्द झाल्या पासून ते दिनांक ०४/०५/२०२४ इ. रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत निविदा भराव्याच्या आहेत. ज्यांना निवीदा भरावयाच्या आहेत त्यांनी खालील अटीस पात्र राहून दि. ०४/०५/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहचतील अशा रितीने निवीदा भराव्यात.

### वॉटर कूलर व वॉटर प्युरिफायर दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी खालीलप्रमाणे.

१) निवीदाधारकाचे जी. एस. टी. नंबर असलेस व निविदाचे दर समान असलेस जी.एस.टी. नंबर निविदाधारकास प्रधान्य देणेत येईल..

२) महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील निवीदाधारकांनी निवीदा भरु नयेत, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

३) वॉटर कूलर व वॉटर प्युरिफायर दुरूस्ती व देखभाल करणेसाठी येणारा खर्च निविदे मध्ये भरावा. नंतर वेगळा चार्ज दिला जाणार नाही.

४) वॉटर कूलर व वॉटर प्युरिफायर दुरुस्ती करणेकरिता वेगळा सर्व्हीस चार्ज दिला जाणार नाही.

५) निवीदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतीम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो साहेब यांना राहतील.

६) जिल्हा न्यायालय, कोल्हापूर न्यायसंकुल येथील वॉटर कूलर व वॉटर प्युरिफाय दुरूस्तीरण करणेचा कालावधी मंजूरीपासून दोन वर्षाकरीता राहील.

७) निविदाधारकांनी प्रत्येक वॉटर वप वॉटर प्युरिफायरचे दुरूस्तीचे दर तसेच जी.एस.टी टक्केवारी वेगवेगळी नमुद करावी.

८) सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या न्यायालयाच्या (http://ecourts.gov.in/kolhapur) या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आली आहे.

९) निविदाधारकांनी निविदा जिल्हा न्यायालय कोल्हापूर येथे दिनांक ०४/०४/२०२४ इ. रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत पोहचतील या रितीने निविदा भराव्यात नंतर आलेल्या निविदाचा विचार केला जाणार नाही.

१०) निवीदाधारकांनी निवीदेमध्ये जी. एस. टी. ची टक्केवारी वेगळी नमुद करावी.

११) सदरच्या प्राप्त होणा-या निवीदा दि. ०४/०४/२०२४ इ. रोजी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे निजीकक्षामध्ये उघडणेत येतील

१२) वॉटर कूलर व वॉटर प्युरिफायर दुरूस्ती व देखभाल करणेसाठी निविदा ही निविदाधारकानी निविदा सिलबंद निविदा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीशसो कोल्हापूर यांचे नावे पाठविणे याव्यात.

१३) निविदाधारकांनी संघ करून निविदा भरू नये. अन्यथा कारवाई करणेत येईल.

१४) निविदाधारकांनी वॉटर कूलर व वॉटर प्युरिफायर दुरूस्ती व देखभाल करणेसाठी निविदा भरावी.

DISTRICT COURT OF KOLHAPUR सत्यमेव जयते कोल्हापूर

दिनांक १९/०४/२०२४ हुकमावरून

अधिक्षक (वित्त)
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर

<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>

१) संगणक विभागप्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते कि, सदरील निवीदा जिल्हा न्यायालय, कोल्हापुर च्या (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसाईटवरती प्रकाशीत करणेत यावी.
२) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.
३) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.
४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.
५) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.
६) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.
७) कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर नोटीस बोर्ड.